# आतला आवाज





# कथकमय मी

डॉ. नंदकिशोर कपोते

शिस्तप्रिय, कडक, अभ्यासमय घर. आजोबा आयुक्त. आजोबांची परंपरा मुलांनी चालवावी ही कुटुंबाची रास्त अपेक्षा! भावंडांनी ती सांभाळलीही, पण पाचांपैकी एकाचा 'सूर' मात्र वेगळा ठरला. अभ्यासात गती असूनही त्याचा श्वास-ध्यास ठरलं ते कथक नृत्य. 'नृत्य' आणि तेही 'पुरुषानं?' महाराष्ट्रासाठी हे विपरितच होतं. पण राज्यातली नृत्यासाठीची पहिली राष्ट्रीय शिष्यवृत्ती, पहिली डॉक्टरेट मिळवून पुढे 'लिम्का बुक' मध्येही पोचून त्यांनी असा नावलौकिक मिळवला की, मागच्या संघर्ष-संयमाची फुलंच झाली. डॉ. नंदकिशोर कपोतेंच्या त्या नृत्यप्रवासाची ही कहाणी.

आयुष्यातलं एखादं वळण फार महत्त्वाचं ठरतं काही वेळा. माझ्या आयुष्यात हे वळण आलं होतं. एक वेळ अशी होती की, तिथे दोन रस्ते फुटलेले होते. एक आयएएसकडे नेणारा आणि दुसरा होता कथककडे. आयएएसकडे वळलो असतो तर भौतिक यशाची खात्री होती, पैशाची शाश्वती होती. जगण्याचा एक निश्चित असा आणि कमी अडचणींचा तो रस्ता होता. पण त्याचवेळी भारत सरकारची सांस्कृतिक विभाग़ाची नृत्यासाठीची राष्ट्रीय शिष्यवृत्ती मला मिळाली होती. महाराष्ट्रातला त्यासाठी निवडला गेलेला मी पहिला कलाकार होतो आणि कथक हा माझा श्वास होता, माझ्यातलं चैतन्य होतं, माझा आंतरिक ओढा होता. मात्र आजोबांची इच्छा होती की मी आयएएसची वाटच चालावी. ते स्वत: कमिशनर होते. पण वडील म्हणाले, 'त्याला कथक आवडतंय. शिष्यवृत्ती मिळाली आहे. करू दे त्याला जे करायचंय ते. त्याला त्याचं नशीब अजमावून बघू दे. पुढचं पुढे बघू. ते रूढार्थानं कलाकार नसले तरी कलेचं महत्त्व त्यांनी जाणलं होतं.

दिल्लीच्या कथक केंद्रात राहून, कथक शिकण्यासाठीचा मार्ग हाती देणारी भारत सरकारची ती शिष्यवृत्ती हा माझ्या आयुष्यातला 'टर्निंग पॉइंट' होता. ती मिळाली नसती तर कदाचित मी पूर्णत: नृत्याला जीवन बनवू शकलो नसतो. मला, माझ्या कुटुंबाला तो खर्च झेपणारा नव्हता. शिष्यवृत्ती-शिवाय कथक दुर्लभच होतं. सुदैवानं तेव्हा हात दिला मला आणि आयुष्य घडलं मला हवं होतं तसं.

नृत्याच्या प्रवासात मागे वळून पाहताना आज काय दिसतंय मला?

लहानग्या नंदूबाबतची एक आठवण तळातून वर येते अलगद. खरंतर मलाही नक्की आठवत नाही, पण ३-४ वर्षांचाच असेन मी, जेव्हा माझे पाय तालावर नाचायला लागले. माझी आजी, आत्या त्या आठवणी सांगतात. तो काळ रेडिओचा होता. रेडिओवर गाणी लागली की मी नाचायला लागायचो. 'मधुबन में राधिका', 'लागा चुनरी में दाग' अशी ती गाणी होती. शास्त्रीय संगीतावर बेतलेल्या नृत्यप्रधान गीतांवर मी स्वत: नृत्य बसवतो, ते सादर करतो हे एक दिवस शाळेत कळलं. मग मला गॅदरिंगमध्ये नृत्य करायला सांगितलं गेलं. मी बहुधा 'मधुबन में राधिका' वरच नृत्य केलं असावं. तेव्हा मी सात वर्षांचा होतो.

कमिशनर असलेल्या आजोबांना या सादरीकरणानंतर मुख्याध्यापकांकडून कळलं की मी छान डान्स करतो. तोवर आजोबांना काहीच माहीत नव्हतं. नृत्य करायला जे काही प्रोत्साहन होतं ते होतं मुख्यत: आजीचं. 'हा उत्तम नृत्य करतो, याला चांगल्या ठिकाणी शिकायला पाठवा' असं आजोबांना शाळेतून सांगण्यात आलं. तेव्हा आम्ही श्रीरामपूरला टिळकनगर जवळ राहात होतो. तिथे नृत्य शिकण्याची काही सोय तर नव्हतीच, पण आजोबाही चिडले होते, मी नृत्य शिकावं अशी त्यांची इच्छा नव्हती. त्यांना मीही IAS Officer व्हावं असंच वाटत होतं. पण माझा आंतरिक ओढा नृत्याकडेच होता. आणि मी स्वत:च काही ठरविण्याचं माझं वयही नव्हतं.

मी साधारण आठ-नऊ वर्षांचा असताना आम्ही श्रीरामपूरहून पुण्यात आलो. त्या काळात नटराज गोपीकृष्ण यांचं नृत्य पाहण्याची संधी मला मिळाली. तेव्हा मला कळलं की पुरुषही नृत्य करतात. त्या काळात महाराष्ट्रात पुरुषांनी नृत्य करणं सन्मानाचं मानलं जात नव्हतं. पण गोपीकृष्णजींचं नृत्य पाहून मी ठरवलं की, हेच नृत्य शिकायचंय मला. पण त्या काळात मला कथक काय असतं? भरतनाट्यम् कशाला म्हणायचं? कुचिपुडी काय असतं? हेच माहीत नव्हतं इतका मी लहान होतो. तेव्हा फक्त 'हेच शिकायचं' हे मी त्यावेळेस ठरवलं. 'जटायूमोक्ष' ही कथा त्यांनी सादर केली होती. त्यावेळी तराणा, तीनताल, झपताल, तोडे-तुकडे, चक्कर असं ते नृत्य होतं. अर्थात, ते काय होतं हे आज मला कळतंय, तेव्हा कळत नव्हतं. पण हे फार आवडतंय, करावंस वाटतंय स्वत:, हे कळत होतं आणि म्हणून मग मी कार्यक्रम संपल्यावर आत जाऊन त्यांना भेटलो. त्यांची सही घेतली. त्यांच्या पाया पडलो आणि त्यांना म्हटलं, 'मुझे भी डान्स सिखना है।' ते म्हणाले, 'आ जाओ। मै बम्बई रहता हूँ। तुम्हे सिखना है तो बम्बई आना पडेगा।' तेव्हा शाळा सोडून मुंबईला जाऊन कथक शिकणं मला शक्य नव्हतं. पण मी आजही त्यांची सही जपून ठेवली आहे. गोपीकृष्ण यांची सुंदर मूर्ती आजही माझ्या नजरेसमोर आहे. तेव्हा तर मी त्यांच्या प्रेमातच पडलो होतो.

मी तेव्हा शिवाजीनगरला मॉडर्न शाळेत होतो. मग ठरलं की नृत्य शिकायचं. शिवाजीनगरला मीरा पंडोल नृत्य शिकवायच्या. त्यांच्याकडे मी तीन-चार महिने गेलो. ६४-

६५ सालचा काळ असावा तो. तिथे चित्रपटातलं नृत्य शिकवलं जायचं. पण मी तिथे रमलो नाही.

काही दिवसांनी आजीला प्रभात रोडला दवाखान्यात जाताना लक्षात आलं की इथे घुंगरांचा आवाज येतोय. मग शोध घेतला. त्या क्लासमध्ये जे नृत्य सुरू होतं ते पाहून माझ्या मनात चमकलं काहीतरी न् लक्षात आलं, 'अरे, गोपीकृष्ण यांचं जे नृत्य आपण पाहिलं ते हेचं होतं. मी त्याच क्षणी ठरवलं की, आता आपण इथेच शिकायचं. तो क्लास होता मुन्नालाल शुक्ल यांचा. ते पं. बिरजू महाराजांचे सख्खे भाचे होते. माझं शास्त्रशुद्ध शिक्षण तिथेच सुरू झालं. प्रभा मराठेही शिकवायच्या तेव्हा. तिथूनच मी डिप्लोमा, डिग्री केली. दरम्यान आयएएस होण्याच्या दृष्टीनं माझं बी.कॉम.चं शिक्षण सुरूच होतं. मी बी.कॉम. झालो आणि त्याचवेळी मी भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी जी मुलाखत दिली होती, त्याची निवड जाहीर झाली. मी निवडला गेलो होतो. भारतातून दोघांचीच निवड त्यासाठी व्हायची. एक लखनौची मुलगी होती. खरंतर वाटलंच नव्हतं की, ही संधी मिळेल. पद्मश्री दमयंती जोशी, पद्मश्री कुमुदिनी लाखिया (उमरावजानच्या नृत्यदिग्दर्शिका) गुरू मोहनराव कल्याणपूरकर, डॉ. कपिला वात्स्यायन, स्वत: पं. बिरजू महाराजजी अशा दिग्गजांचं भक्कम पॅनल होतं माझी मुलाखत घ्यायला. माझ्याबरोबर मुलाखतीला आलेल्या सगळ्या मुलीच होत्या. मुलगा फक्त मीच! मी मुलाखत देऊन आलो, पण आल्यावर तो विचार सोडलाच होता. त्या काळात मी चक्क जंगली महाराज रस्त्यावरच्या पथिक हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्टची नोकरीही सुरू केली होती. अशातच आयएएसचं पत्रंही माझ्या हातात आलं आणि शिष्यवृत्ती मिळाल्याचंही! आता काय करायचं? हा प्रश्न उभा राहिला. आजोबांची इच्छा होती, मी आयएएसचा रस्ता धरावा आणि दुसऱ्या बाजूला मला मात्र नृत्यच करायचं होतं. वडिलांनी विश्वास दाखवून मला पाठिंबा दिला. आणि मी दिल्लीला गेलो. दिवाळीच्या दिवशीचंच माझं तिकीट होतं. तेव्हा तीन दिवस लागायचे दिल्लीला जायला. दिवाळी प्रवासात गेली. 'दोन महिन्यांनी जॉइन होतो' असं कळवता येतं, हेही मला माहीत नव्हतं. माहिती घ्यावी हे सुचलंच नाही, कारण केवळ उत्सुकता आणि आनंद मनात होता.

पुढची वाटचाल गुरुकुल पद्धतीनं सुरू झाली. पण महाराजजींनी लगेच शिकवायला सुरुवात केली, असं मात्र झालं नाही. त्या काळी गुरू परीक्षा घेत असत शिष्यांची. महाराजजींनीही माझं नृत्यप्रेम, माझा संयम आजमावला शिकवायला सुरुवात करण्यापूर्वी. मी सहा महिन्यांहूनही अधिक काळ बसूनच होतो. तो सारा काळ महाराजजींची सेवा करण्यात धन्यता मानली मी. अगदी चहा करण्यापासून पाय दाबण्यापर्यंत आणि घरची दळणं आणण्यापर्यंतची कामं करायचो मी. महाराजजींचं काही बांधकाम सुरू होतं तेव्हा ते काम पाहायलाही जायचो मी. महाराजजी घरीही घेऊन जायचे मला. माझ्या घरी तर यातलं काही काम माहिति नव्हतं मला, पण इथं मी ती करायचो. अगदी मुलासारखंच वागवायचे महाराजजी मला. तो काळ त्यांच्या देशविदेशात सुरू असलेल्या भरगच्च कार्यक्रमांचा होता. त्यावेळी त्या कथक केंद्रात आणखी काही गुरू आणि त्यांचे विद्यार्थी होते. ते विद्यार्थी म्हणत, 'अरे, तुमको तो यहाँ कुछ भी सिखनेको नहीं मिल रहा है। तुम दुसरे गुरू के पास जाओ ।' मी मात्र माझ्या निश्चयावर ठाम होतो. महाराजजींचं नाव, त्यांचं गुरू म्हणून मला सोबत सगळीकडे घेऊन जाणं हेही माझ्यासाठी पुरेसं होतं. गुरुप्रती समर्पणाचाच काळ होता तो.

असे ७-८ महिने गेले. महाराजजींच्या घरी जाणंही सुरू होतं. एका रात्री मी आणि आसामचा बिपुल नावाचा मुलगा महाराजजींचे पाय दाबत बसलो होतो. वसतिगृहात राहात होतो तेव्हा आम्ही, पण बरेचदा महाराजजींकडेही राहायचो, त्यांच्या पाच मुलांसोबत. त्यांच्याच सारखं प्रेमानं. महाराजजी झोपले की मग आम्ही झोपायचो. त्या दिवशीही ते झोपले होते. अचानकच रात्री ते जागे झाले. म्हणाले, 'नंदू, ये देखो!' त्यांनी 'धा' कसा मारायचा ते दाखवलं आणि माझं नृत्यशिक्षण खऱ्या अर्थानं सुरू झालं महाराजजींकडे. तेव्हा रात्रीचा दीड वाजला होता.

त्या काळात माझा दिनक्रम ठरून गेलेला होता. सकाळी उठायचं. स्वत:चं आवरायचं आणि पायात घुंगरू बांधून स्वत:चा रियाझ करायचा, तास-दोन तास. दरवाजे बंद करायचे. फक्त घुंगराचा आवाजच कानात आला पाहिजे, बाकीच्या आवाजाला पूर्णत: बंदी असा रियाझ असायचा तो. त्यानंतर न्याहारी करून कथक केंद्रात जायचं दहाच्या सुमाराला. महाराजजी दहा वाजता तिथे येत नसत, पण तबलावादक आलेले असायचे.

ज्यांचा विरोध आहे त्यांनाच परीक्षा घ्यायला बोलवा. आणि त्यानंतर जर मी योग्यप्रकारे शिकवत नाही असं वाटलं तर मी माझ्या विद्यार्थिनी पुढील शिक्षणासाठी त्यांच्याकडे पाठवीन. सहा महिन्यांनी माझ्या विद्यार्थिनींवर या गुरूंनी प्रथमवर्ग देऊन माझ्या कामावर शिक्कामोर्तब केलं. माझं या सर्व गुरूंशी स्नेहाचं नातं निर्माण झालं. प्रारंभ अडचणीचा होता, पण मी स्वत:ला निष्ठेने आणि विनम्रपणे सिद्ध करत गेलो. आज माझ्याकडे काही कार्यक्रम असले आणि मी या ज्येष्ठ गुरूंना माझ्याकडे बोलावलं ते नक्की माझ्याकडे येत असतात. हे संयम आणि निष्ठेचं फळ आहे.

पुढे मी पुणे विद्यापीठाबरोबर इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें एक कार्यक्रम केला होता. त्यात पुण्यातले सगळे कथक नर्तक सहभागी झाले होते. पं. रोहिणी भाटे, शमा भाटे, मनीषा साठे, शरदिनी गोळे, सुजाता नातू आणि मी स्वत:. या दोन दिवसांच्या महोत्सवात सोलो नृत्यं सादर केली. त्या महोत्सवातल्या माझ्या नृत्याला पं. रोहिणी भाटे यांनी विशेष दाद दिली होती. आमच्या नृत्यात आमद, थाट असे जे स्लोपोर्शन असतात ते अतिशय अप्रतिम झाल्याचं त्यांनी आवर्जून सांगितलं होतं. तो क्षण आजही माझ्या लक्षात आहे.

माझा प्रारंभकाळ हा संख्येनं मोजक्याच रसिकांना शास्त्रीय नृत्य नीट परिचित असण्याचा काळ होता. अशावेळी कलाकार म्हणून वेगवेगळ्या प्रकारच्या रसिकांसमोर वेगवेगळ्या पद्धतीनं नृत्याचं सादरीकरण करण्याचं कौशल्य आपल्याकडे असायला हवं, हे माझ्या लक्षात आलं. त्याकाळी ज्येष्ठ नर्तकांची जी पिढी होती ती आपल्या जागी ठाम होती. समोर बसलेल्यांना काही कळो न कळो ते वेगळं काही करण्यापेक्षा परंपरागत नृत्यच जपण्याला महत्त्व द्यायचे. मी मात्र माझ्या नृत्यात काही बदल केले आणि अर्थातच ते नृत्याचं शास्त्र न कळणाऱ्या रसिकांनाही आवडायला लागलं. शास्त्र न कळणाऱ्या रसिकांना कंटाळा येऊ नये याची काळजी घेतल्यामुळे त्यांना नृत्याचं सौंदर्य अनुभवता यायला लागलं. या दृष्टीनं प्रयोग करताना मी पदन्यास आणि तबला यांच्या जुगलबंदीच्या पद्धतीत बदल केला. नेहमी पदन्यास आधी आणि तबला नंतर अशी जुगलबंदी रंगते. पण मी दोन्ही गोष्टी एकाच वेळी सादर करायला सुरुवात केली. 'हारजित' असं ते सादरीकरण होतं. हे सादरीकरण रशियन रसिकांनाही खूप भावलं होतं. मी दिल्लीत असताना तिथल्या महाराष्ट्र मंडळामध्ये 'सुखकर्ता दुखहर्ता' या श्री गणेशाच्या आरतीवरही कथक नृत्य सादर केलं होतं. नवनवीन प्रयोग करून पाहण्याची आस माझ्यात पहिल्यापासूनच होती. मी फक्त त्या माझ्या आतल्या हाकेला कृतीनं प्रतिसाद देत गेलो. नवीन काही करत राहण्याची ओढ, अधिकाधिक रसिकांना कथकनृत्याशी जोडून घेण्याची, कथकचा प्रसार करण्याची इच्छा यामुळे माझी ही प्रयोगशीलता वाढत राहिली आणि ती आजही टिकून आहे.

महाराजजींची इच्छा प्रमाण मानून मी पुण्यात आलो. एकीकडे माझं नृत्य अधिक प्रगल्भ, सौंदर्यवान व्हावं म्हणून स्वत:मधला विद्यार्थी सतत परिपूर्णतेकडे नेण्याचा प्रयत्न करत राहिलो. त्याचवेळी अनेक नवे विद्यार्थी घडवत राहिलो. गुरूंनी दिलेलं ज्ञान पुढच्या पिढ्यांकडे वाहातं ठेवलं. हे सगळं करताना

**कलाकाराच्या सृजनशीलतेला सामाजिक बांधिलकीची किनार असेल, तर कलावंताच्या अंतरंगाचीही एक मोहिनी रसिक मनावर राज्य करते. डॉ. कपोते यांच्या व्यक्तिमत्वातही सर्जन आणि सहृदयता यांचा देखणा संगम आढळतो. १९८७ च्या सुमारास गीत आणि नाटक प्रभाग आणि आदिवासी प्रशिक्षण संशोधन संस्था यांच्याशी त्यांचा संपर्क आला आणि सुरू झाला समाजाच्या ऋणातून उत्तराई होण्याचा सिलसिला. त्यातूनच अनेकानेक सामाजिक समस्या नृत्यातून मांडून खेडोपाडी जगजागृती करणं, झोपडपट्टीत जाऊन गरीब मुलांसाठी मार्गदर्शन शिबिरं घेणं आणि आदिवासी, मागासवर्गीय मुलांना तसंच अपंग मुलांना मोफत नृत्य शिकवणं सुरू झालं. कपोतेसरांकडे आज घडीला ३०० पेक्षाही अधिक विद्यार्थी मोफत शिक्षण घेत आहेत आणि अनेक गरीब आदिवासी, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या मोफत निवासाची सोयही डॉ. कपोते यांच्या संस्थेत करण्यात आली आहे.**

रसिकांची भरपूर दाद, त्यांचं प्रेम, विद्यार्थ्यांकडून भक्तिभाव या साऱ्या आनंददायी अनुभूती मला मिळत होत्या. पण माझ्या मनाला प्रतीक्षा होती ती माझे गुरू पं. बिरजू महाराजजींनी केलेल्या कौतुकाची. माझं नृत्य सुंदर आहे! असं काही त्यांनी म्हणावं याची महाराजजी माझ्या सगळ्या महत्त्वाच्या प्रसंगी माझ्यासोबत होते. ते आजही आठ-आठ दिवस माझ्या घरी येऊन राहतात, पण त्यांच्या शाबासकीसाठी मला तब्बल ३० वर्षं वाट पाहावी लागली.

महाराजजींचा धाक अगदी आजही जबरदस्तच आहे. ते समोर असताना नृत्य करायचं असेल तर आजही माझे हात थरथरतात. अनेकदा मी महाराजजींसमोर नृत्य सादर केलं आहे, पण महाराजजी ते काहीही न बोलता पाहायचे. दोन-तीन वर्षांपूर्वी ते असेच एकदा आमच्या निगडीच्या घरी राहायला आले होते आठ दिवस. दिवसभर आमचे कार्यक्रम चालायचे तेव्हा. एक दिवस रात्री घरी आल्यावर मी त्यांना म्हटलं, 'महाराजजी, आपके लिए मैंने एक शुटिंग किया है डान्स का । वो दिखाना है आपको।' त्या दिवशी त्यांनी तो माझा रेकॉर्डेड डान्स पाहिला. रात्री तीन-साडेतीन वाजेपर्यंत त्यांनी ती कॅसेट पाहिली आणि पहाटे पहाटे माझ्या डान्सचं, नृत्यकौशल्याचं त्यांनी कौतुक केलं. माझी प्रतीक्षा-तपश्चर्या त्या पहाटे फळाला आली. माझ्या महाराजजींकडच्या शिक्षण प्रारंभालाही पहाटेचाच मुहूर्त मिळाला होता.

या प्रवासात माझ्यातला शिक्षक-गुरू आकाराला येत राहिला. आज मी कथकच्या विद्यार्थ्यांना पीएचडी करिता गाईड करतो. त्यांच्यासाठी मी महाराजजींच्या नावानं 'डान्स

**कलाकाराच्या कलाजीवनात परीक्षेचे आणि सफलतेचे वेगवेगळे क्षण येत असतात. अशाच एका क्षणी रामकृष्ण तगारे नावाचे ७६ वर्षांचे गृहस्थ डॉ. कपोतेंच्या नृत्यसंस्थेत पोहोचले. म्हणाले, 'मला नृत्य शिकायचंय, शिकवाल का?' कपोते सरांची चकित-संभ्रमित व्हायची ती वेळ होती. गुडघे दुखतायत-हात थरथरताहेत... असा हा शिष्य पत्करावा की नाही? पदन्यास करताना, गिरक्या घेताना दुखापत झाली तर? पण हे गुरुशिष्य दोघेही जगावेगळे ठरले. बघता बघता गिरक्या घेण्यापर्यंत तगारेंनी प्रगती केली आणि आश्चर्य म्हणजे कथक कलेच्या परिणामी तगारेंच्या हातांची थरथरही बंद झाली नृत्य शिकवता शिकवता या ज्येष्ठ शिष्याच्या मना-शरीरात चैतन्याचा स्रोत पुन्हा एकदा खेळवणाऱ्या कपोतेसरांनी ६० वर्षांच्या खांडेकर यांनाही नृत्य शिकवलं. केवळ शिकवलं एवढंच नव्हे तर या दोन ज्येष्ठ शिष्यांचा जाहीर कार्यक्रमही केला. हाच कार्यक्रम कपोतेसर आणि त्यांच्या शिष्यांना 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स्'मध्ये घेऊन गेलं.**



रिसर्च सेंटर'ही उभं केलं आहे. या सगळ्यात अत्यंत आनंदाची गोष्ट ही आहे की, मी जेव्हा जेव्हा नवीन गोष्टी सुरू केल्या त्या सगळ्याच वेळेला महाराजजी उपस्थित होते. मी डॉक्टरेट केली. माझे गाईड होते महाराजजी. विषय होता कथक नृत्याचे बदलते स्वरूप. त्याचं मानपत्र मला मिळालं तेव्हाही त्या आनंदक्षणी महाराजजी माझ्यासोबत होते. कथकमध्ये डॉक्टरेट करणारा मी (महाराष्ट्रातला) पहिलाच आणि महाराजजींचाही पहिलाच शिष्य Phd करणारा त्याकाळी डॉक्टरेट कुणीच केली नव्हती. त्यासाठी मी पुणे विद्यापीठात खूप प्रयत्न केले, पण विद्यापीठात तशी सुरुवातच झाली नव्हती मग मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठात गेलो आणि तिथल्या कुलगुरूंनी माझ्यासाठी नृत्यात Phd करण्याची सोय सुरू केली ५०० वर्षांचा कथकता इतिहास आणि त्या मोठ्या पटावर कथकमध्ये झालेले बदल याचा सारा अभ्यास मी पहाटे पहाटेपर्यंत त्यासाठी जागत बसायचो. डॉक्टरेट मिळवायचीच ही देखील माझ्या मनात अगदी पहिल्यापासूनची इच्छा होती. सुदैवानं माझी ती इच्छाही सफल झाली, त्या वाटचालीत माझे गुरू सतत माझ्या पाठीशी राहिले. माझ्या आतला विद्यार्थी सतत काहीतरी मागत राहतो नेहमी.

कथक करता करता काही चित्रपटासाठी मी नृत्यदिग्दर्शनही केलं आणि एका चित्रपटात तर अभिनयही केला. ते साल होतं १९८३. 'नाच' नावाच्या एका भोजपुरी चित्रपटात मी नायकाची मुख्य भूमिका केली होती. ओमप्रकाश नावाचे त्या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. त्यांनीदिल्लीत माझं नृत्य पाहिलं होतं आणि मला चित्रपटासाठी निवडलं होतं. बनारसला चित्रीकरण झालं त्या चित्रपटाचं. त्याच काळात मला परीक्षक म्हणून काम करण्याचीही संधी मिळाली आणि नेमकं केंद्र मिळालं होतं गोपीकृष्ण यांचं. माझी त्यांच्या केंद्राला पहिली भेट झाली ती अशी परीक्षक म्हणून... ज्यांचं नृत्य पाहून, प्रेरणा घेऊन मी कथक नृत्यक्षेत्रात आलो. पुढे आमच्यातही मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. दुर्दैवानं त्यांचं निधन लवकर झालं. ते मला म्हणायचे, 'तुम पिक्चर में डान्स डायरेक्शन क्यू नहीं करते?' मला त्यांना 'नाही' म्हणता येत नव्हतं. त्यावेळी चित्रपटासाठी नृत्यदिग्दर्शन करण्यासाठी स्पेशल कार्ड- विशेष ओळखपत्र-परवानगी पत्र बनवून घ्यावं लागायचं. गोपीकृष्ण यांनी माझ्यासाठी तेही बनवून घेतलं होतं. 'नाचे मयुरी' या चित्रपटाचं काम तेव्हा सुरू होतं. प्रत्यक्ष जायची वेळ आली तेव्हा मात्र मला महाराजजी आठवले आणि मी न जाण्याचा निर्णय घेतला. महाराजजींना चित्रपटासाठी काम करणं आवडायचं नाही. त्यांच्या फार मागे लागल्यावर त्यांनी 'देवदास'सारखा चित्रपट केला. तोही कथकसाठी. मग मीही हा मार्ग बाजूलाच ठेवला. चार-पाच चित्रपट मीही केले. 'देवदास'साठी महाराजजींचा सहायक होतो, 'दिल तो पागल है' मधली शाहरुख खान आणि माधुरी दीक्षित यांची नावाजली गेलेली जुगलबंदी दिग्दर्शित केली. 'मराठीत 'हे गीत जीवनाचे' साठी काम केलं, पण हे फारच तुरळक होतं. 'ययाति-देवयानी' नाटकासाठीही नृत्य दिग्दर्शन केलं. मनात मात्र आजही येतं की, चित्रपटासाठी नृत्यदिग्दर्शक झालो असतो तर काही वेगळं घडलं असतं का? पण महाराजजींसाठी नाही गेलो तिकडे. आणि हे केलं नाही म्हणूनच आज शास्त्रीय नृत्यात माझं जे नाव आहे ते कमवू शकलो. कलाकारापुढे अशा दोन वाटा फुटण्याची वेळ येतेच कधीकधी. अंतर्मन जागं असेल तर नीट मार्ग निवडला जातो.

मी चित्रपटांसाठी काम केलं नाही, पण अनेक बॅले मात्र सादर केले. नटश्रेष्ठ बालगंधर्वांवरच्या बॅलेला रसिकांनी खूप मोठा प्रतिसाद दिला. १९८६ सालात मी सहजच बालगंधर्व रंगमंदिरात गेलो होतो आणि बालगंधर्वांचे तिथले स्त्री वेषातले आणि पुरुष वेषातले फोटो पाहून मी फारच प्रभावित झालो. नवीन काही करण्याची जिद्द त्यावेळी माझ्यात होती. १९८७ हे वर्ष होतं बालगंधर्वांच्या जन्मशताब्दीचं. मनात आलं, आपण बालगंधर्वांवरतीच काही नवं करावं कथकच्या माध्यमातून. मग घरी चर्चा केली तर आई चिडलीच, 'ते स्त्रीवेषातलं वगैरे काही करू नकोस' म्हणाली; पण वडिलांचा पाठिंबा होता त्याही वेळी. वडिलांमुळे प्रत्यक्ष कामाला अभ्यासाला सुरुवात केली. या बॅलेसाठी शोध घेताना कळलं की पौर्णिमा तळवलकर (शरद तळवलकरांच्या पत्नी) या बालगंधर्वांच्या शैलीतल्या गायिका आहेत. मग मी भेटलो त्यांना. गाणी नक्की झाली. निवेदक ठरला सुधीर गाडगीळ. 'नाही मी बोलत नाथा', 'मजवरी तयांचे प्रेम खरे', 'किती किती सांगू तुला?', 'संशय का मनी आला?' अशी पदं घेऊन तो कार्यक्रम तयार झाला. मी आणि माझे विद्यार्थी त्यात सहभागी होतो. त्याचा सराव चालायचा आमच्या केंद्रात सतत; पण 'मी स्त्री वेषात काही सादर करणार आहे' प्रारंभी कार्यक्रमात याचा शब्दश: कुणालाच

पत्ता नव्हता. एक 'अष्टनायिका' मी नऊ दहा विद्यार्थिनींसह बसवली होती. हा कार्यक्रम 'हाऊसफुल' होता. बसायलाही जागा उरली नव्हती. मुख्य नर्तकांनासुद्धा. नर्तकच विंगेतून उभं राहून बघत होते.

मी तयार झालो होतो, अर्थात स्त्रीवेषात होतो. एक नर्तिका आत आल्या मला शोधत. माझ्या शेजारी आई उभी होती, तिला त्यांनी विचारलं, 'नंदकिशोर कुठं आहेत?' आई म्हणाली, 'हा काय नंदकिशोर!' त्या चकित झाल्या होत्या. नंतर कार्यक्रम सुरू झाला. पडदा उघडतो. मंद लाईटमध्ये माझी पोझ असते. मी आलो की सुरुवात करायची ही माझ्या वादकांना सवय होती. राजू जावळकर, माझा तबलजी चुळबुळ करायला लागला होता. 'कपोते कुठं आहेत? आणि या बाई कोण?' हा त्यांचा प्रश्न त्यांच्या चुळबुळीतून मला स्पष्ट दिसत होता. नृत्य संपल्यावर मीच स्त्रीवेषात होतो हे जाहीर केलं सुधीरनं. सारेच अवाक् झाले. तो प्रसंग, तो बॅले-नृत्यनाटिका आजही माझ्या डोळ्यासमोर आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरही मी 'महामानव' ही नृत्यनाटिका सादर केली. १९९० सालात मी आणि एक सतारवादक असे आम्ही मुंबईला महाराजजींना भेटायला निघालो होतो. दिवस होता १४ एप्रिल. पुणे स्टेशनला डॉ. बाबासाहेबांचा पुतळा आहे, तुफान गर्दी होती तिथे त्या दिवशी. सतारवादक मला म्हणाले की, 'तुम्ही बाबासाहेबांवर का नाही काही सादर करत?' माझ्या मनात हा विचार पक्का रुजला. दुसरं काही सुचेचना त्या दिवसापासून. मी बाबासाहेबांची पुस्तकं आणली. रेकॉर्ड्स आणल्या. अभ्यास सुरू केला. पण मला नृत्यासाठी जे हवंय ते सापडेना. त्यातच मला कुणीतरी सुचवलं की, 'साँग अँड ड्रामा' डिव्हीजनच्या विजयकुमार गवई यांना भेटा. गवईंना भेटलो तर कळलं की, बाबासाहेबांवर त्यांनी नृत्यनाटिका लिहिलीय आणि तिला रेडिओकडून पहिलं बक्षीस मिळालंय. त्या नाटिकेची सुरुवातच फार सुंदर होती. 'आकाशात पऱ्या नाचताहेत, खेळताहेत, बागडताहेत. पैकी एकीचं लक्ष पृथ्वीवर जातं. तिला महूगाव दिसतं. तिथं त्या महामानवाचा जन्म होत असतो'. बाबासाहेबांचा जन्म, शिक्षण, परदेशगमन, चवदार तळं असं सारं मी नृत्यात बसवलं. त्याचेही खूप कार्यक्रम झाले. हा खूप वेगळा बॅले होता माझा. या नृत्यनाटिका रचण्याचा प्रवास अपार आनंदाचा झाला.

आता कथकसाठी चिरकाल टिकणारं असं काही करावं, अशी इच्छा मनात आहे. त्यातूनच कथक क्वीन 'सितारादेवी म्युझियम' या नावानं मी कथक कलाकारांसाठी संग्रहालय उभं करतो आहे. ९५ वर्षांच्या सितारादेवी स्वत: त्याचं उद्घाटन करून गेल्या. मदतीशिवाय उभंही राहू न शकणाऱ्या सितारादेवींनी उद्घाटनावेळी जिद्दीनं नृत्य मात्र सादर केलं. त्या जिद्दीला मी सलाम करतो. एका ज्येष्ठ कलाकाराचं कलेवरचं हे अजोड प्रेम माझ्यासारख्या कित्येकांना प्रेरणा देत राहातं, थक्क करत राहातं.

महाराजजी, सितारादेवी, गोपीकृष्ण, पं. भीमसेन जोशी आणि झाकीर हुसेन यांच्या विषयीचा आदर घेऊन, त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन माझा प्रवास आजही सुरू आहे. या प्रवासात मी माझ्या गुरूंशी, माझ्या नृत्यप्रकाराशी, माझ्या घराण्याशी निष्ठा ठेवून सतत प्रयोगशील आणि स्वीकारशील राहण्याचा प्रयत्न केला. 'कथक'ला सर्वदूर नेण्यासाठी झटत राहिलो. रसिकांनीही त्याला खूप दाद दिली. मला प्रेम दिलं. आणि हे प्रेमच माझ्यासाठी ऊर्जास्त्रोत बनलेलं आहे. नवं काही सुचत राहावं, कल्पनेत दिसणारं नवं काही साकार करण्याची ऊर्मी टिकून राहावी, अस्तित्वातल्या ऊर्जेच्या अखेरच्या कणापर्यंत कथक करण्याची क्षमता आणि सितारादेवींची जिद्द माझ्यातही वाहात राहावी, हीच इच्छा आहे. कलावंताची तहान याहून दुसरी काय असणार?

शब्दांकन
**स्वाती प्रभुमिराशी**